महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

बुधवार, दिनांक १९ जून, २०१९

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री :

(क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **विधी व न्याय विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सामान्य प्रशासन विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(२) उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास, मंत्री :

(क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी

विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **मराठी भाषा विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ग) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(घ) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **अल्पसंख्याक विकास विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(३) जलसंपदा मंत्री : मा.राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१९-२०२० च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

तीन : लोकलेखा समितीचा "बावन्नावा", "त्रेपन्नावा", "चोपन्नावा" तसेच "पंचावन्नावा" व "छपन्नावा" अहवाल सभागृहास सादर करणे

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु चर्चा न झालेली लक्षवेधी सूचना)

(१) **सर्वश्री. अमित देशमुख, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री त्र्यंबकराव भिसे, मो.आरिफ नसीम खान, अस्लम शेख, डॉ.संतोष टारफे, श्री कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, कु.प्रणिती शिंदे, श्री सुनिल केदार, प्रा. विरेंद्र जगताप, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. सुनिल प्रभू, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई स्थित उघड्यावर विक्री केल्या जाणाऱ्या रस्त्यावरील लिंबू सरबत व ऊसाच्या रसासाठी वापरले जाणारे पाणी दुषित असल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पाहणीत आढळून येणे, लिंबू सरबताच्या २८० नमुन्यांपैकी २१८ नमुने दुषित आढळून येणे, ऊसाच्या रसाच्या ३०३ नमुन्यांपैकी २६८ नमुने दुषित आढळून आले तर बर्फाच्या ३८५ नमुन्यांपैकी ३०० नमुने दुषित आढळून येणे, तसेच काही शेतकरी डोंबिवली एमआयडीसीतील कंपन्यातून निघणाऱ्या रासायनिक सांडपाण्याचा उपयोग पालेभाज्या पिकविण्यासाठी रेल्वेच्या ओसाड जमिनीवर करीत असल्याचे निदर्शनास येणे, तब्बल ८ एकर जमिनीवर घाण व विषारी पाण्यावरील भाज्यांची शेती करण्यात येणे, सदर भाज्यांची घाटकोपर ते दादर दरम्यान विक्री केली जात असणे, मध्य रेल्वेच्या ठाकुर्ली रेल्वे स्टेशनशेजारी रूळालगत मोकळ्या भूखंडावर भाजीपाला पिकविणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतरही कोणतीही कारवाई न होणे, मुंबई शहर व आसपासच्या विभागांमध्ये दुषित पाण्यावर भाजीपाला पिकवून शहरवासियांचे आरोग्य धोक्यात येणे, तसेच शहरामध्ये उघड्यावर विकले जाणारे अन्नपदार्थ चांगल्या दर्जाचे नसून रासायनिक प्रक्रियेने बनविलेले फळ, भाज्या मोठ्या प्रमाणात शहरात विकत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, सदर घटनांमुळे जनसामान्यांमध्ये वाढत चाललेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, छगन भुजबळ, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री.राहुल मोटे, संदीप नाईक, हसन मुश्रीफ,भास्कर जाधव, वैभव पिचड, पांडुरंग बरोरा, राहुल जगताप, दत्तात्रय भरणे, राणाजगजीतसिंह पाटील, दिपक चव्हाण, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. पंकज भुजबळ, नरहरी झिरवाळ, सुरेश लाड, विजय भांबळे, संजय कदम, बाळासाहेब पाटील, मकरंद जाधव-पाटील, भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, डॉ.मधुसूदन केंद्रे, सर्वश्री बबनराव शिंदे, दिलीप सोपल, शिवेंद्रसिंह भोसले, मनोहर नाईक, संग्राम जगताप, सर्वश्रीमती सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री. अवधूत तटकरे, प्रदीप जाधव-नाईक, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री. मंगेश कुडाळकर, सुनिल शिंदे, संजय पोतनीस, ॲड.**

भीमराव धोंडे, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाकडून घेण्यात आलेल्या १२ वी च्या परिक्षेचा यावर्षाचा नुकताच जाहीर करण्यात आलेला निकाल, विज्ञान शाखेतील निकालात सुमारे ३.५ टक्क्यांची घट झालेली असणे, विज्ञान शाखेतील अनेक विद्यार्थ्यांना जे.ई.ई., जे.ई.ई. ॲडव्हान्स यासारख्या स्पर्धा परिक्षांमध्ये अतिशय वरच्या श्रेणीचे गुण मिळाले असताना १२ वी च्या परिक्षेत महत्वाच्या विषयांमध्ये या विद्यार्थ्यांना ५० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळाल्याने या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र व आर्किटेक्चर या विषयांमधील प्रवेशापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली परिस्थिती, गुणपडताळणी व पुनर्मुल्यांकनासाठी आवश्यक असलेल्या छायांकित प्रतींसाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर केलेले अर्ज, परंतू पुनर्मुल्यांकनासाठी एक ते दीड महिन्याचा कालावधी लागणार असणे, प्रत्येक विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या पुर्नतपासणीसाठी मंडळाकडे ४०० रुपये भरावे लागणार असल्याने विद्यार्थ्यांना बसत असलेला आर्थिक भुर्दंड, यास्तव राज्य मंडळाकडे प्रलंबित असलेले बारावीच्या विद्यार्थ्यांचे पुनर्तपासणी अर्ज युद्धपातळीवर निकाली काढून राज्य मंडळाची गुणदान पद्धत सीबीएसई आणि अन्य मंडळांच्या धर्तीवर करण्याबाबत पालकांची मागणी असणे, या संदर्भात लोकप्रतिनिधी तसेच विद्यार्थी आणि पालकांनी मा. मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांना न्याय देण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. मंगलप्रभात लोढा, सुनिल प्रभू, अबू आजमी, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्लास्टिक कचऱ्याची पध्दतशीरपणे विल्हेवाट लावण्यासंबंधी कृती योजना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) सादर न केल्यामुळे महाराष्ट्रासह २१ राज्य सरकारांना राष्ट्रीय हरीत लवादाने प्रत्येकी दरमहा एक कोटी रुपये दंड भरण्याचे दिनांक २६ मे, २०१९ रोजी दिलेले आदेश, राज्यात प्लास्टिक आणि घनकचरा व्यवस्थापनाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असणे, राज्यात प्लास्टिक पिशवी बंदीचा निर्णय घेऊनही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, प्लास्टिक पिशवी नष्ट करणेबाबत अद्यापही राज्य व महानगरपालिकेकडून पुरेशा प्रमाणात उपाय योजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यात प्लास्टिक आणि घनकचरा व्यवस्थापनाची स्थिती गंभीर असूनही राज्य शासन आणि महानगरपालिकेकडून या महत्वाच्या विषयाला प्राथमिकता न दिल्यामुळे सदर समस्येमध्ये झालेली चिंताजनक वाढ केंद्रीय सीपीसीबी मंडळाने दिनांक ३० एप्रिलपर्यंत कृती योजना सादर करण्याची मुदत देऊनही त्याचे पालन न करणे, एकंदरीत प्लास्टिक आणि घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे संबंधी कृती योजना तयार करणेबाबत शासन गंभीर नसल्याची बाब निदर्शनास येणे, यामुळे राज्यातील प्रदूषणात वाढ होऊन पर्यावरणाचा झालेला प्रचंड ऱ्हास, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)

सात : शासकीय विधेयके :

(अ) सहकार मंत्र्यांचा प्रस्ताव (म.वि.स. नियम १५४ अन्वये) :-

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

(ब) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१९

(२) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) (पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१९

(३) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९

(४) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१९

(५) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१९

(६) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१९

(७) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९

(क) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम

१४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-

सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ — महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८

(ड) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, वसंतराव चव्हाण, डॉ.संतोष टारफे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - डी.वाय.पाटील विद्यापीठ,

पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : सर्वश्री रणधीर सावरकर, सुनिल प्रभु, राजेंद्र पाटणी, सुभाष साबणे, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री प्रशांत बंब, राजाभाऊ वाजे, शिवाजीराव नाईक, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री बाबुराव पाचर्णे, अनिल कदम, हरिष पिंपळे, संजय रायमुलकर, संजय शिरसाट, डॉ. सुनील देशमुख, सर्वश्री किशोर पाटील, उदयसिंग पाडवी, संदिपानराव भूमरे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री राजेंन्द्र नजरधने, ज्ञानराज चौघुले, समीर कुणावार, नारायण पाटील, संजय सावकारे, शंभुराज देसाई, हरिभाऊ जावळे, अनिल बाबर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री प्रकाश आबिटकर, कृष्णा गजबे, उल्हास पाटील, सुरेश भोळे, सत्यजीत पाटील, बाळासाहेब मुरकुटे, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री नारायण कुचे, चैनसुख संचेती, शिवाजीराव कर्डिले, ॲड आकाश फुंडकर, श्री गोवर्धन शर्मा, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री राजू तोडसाम, बाळासाहेब सानप, श्रीमती स्नेहलता कोल्हे, सर्वश्री रमेश बुंदिले, संजिवरेड्डी बोदकुरवार, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री सुधीर पारवे, चरण वाघमारे, कृष्णा खोपडे, संजय पुराम, तानाजी मुटकुळे, डॉ. तुषार राठोड, श्री.संतोष दानवे, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री आर.टी.देशमुख, अमल महाडिक, सुरेश हाळवणकर, महेश लांडगे, मनोहर भोईर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :

"राज्यात तालुक्यांमध्ये माहे जून ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृद आर्द्रता, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांपैकी १५१ तालुक्यांमधील १७,९८५ गावांमध्ये गंभीर/मध्यम स्वरुपाचा दुष्काळ शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजीपासून घोषित केला असणे, त्यानंतरच्या कालावधीत १५१ तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसुली

मंडळामध्ये सरासरी पर्जन्याच्या ७० टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा एकूण २६८ महसूली मंडळांतील ५,०९० गावांमध्ये शासनाने दुष्काळ घोषित केला असणे, तसेच ९३१ गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली असणे, अशारीतीने राज्यातील एकूण ४१ हजार गावांपैकी २९ हजार गावांमध्ये दुष्काळ असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी मा. मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात येणे, प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई नियंत्रण व समन्वयासाठी स्वतंत्र कक्ष स्थापण्यात आला असणे, राज्यातील मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयातील पाणीसाठा सन २०१८ च्या तुलनेत निम्मा किंवा त्याहूनही कमी असल्याची बाब निदर्शनास येणे, दुष्काळ घोषित केलेल्या किंवा दुष्काळसदृश परिस्थिती घोषित केलेल्या गावांतील शेतकऱ्यांना शासनाकडून जमिन महसूलात सूट, सहकारी संस्थांच्या कर्जाचे पुनर्गठण, मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना पिक कर्जमाफी देण्यात येणे, शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालू विज बिलात ३३.५ टक्के सुट देऊन अंदाजे रुपये ६७३.४१ कोटीची सवलत देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामांच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करणे, विज थकबाकी न भरल्याने बंद करण्यात आलेल्या ३,३२० पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरु करण्यात येणे, इ. धोरणात्मक निर्णय करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न, राज्यात १,२६४ ठिकाणी चारा छावण्या सुरु करण्यात येणे व त्यात सुमारे १० ते ११ लाख जनावरे असणे, चारा छावण्यांसाठी औरंगाबाद विभागीय आयुक्तांना १११ कोटी, पुणे विभागीय आयुक्तांना ४ कोटी व नाशिक विभागीय आयुक्तांना ४७ कोटींचा निधी वितरित करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास येणे, चारा छावण्यांच्या ठिकाणी तात्पुरती स्वच्छतागृहे उभारण्यात येणे, चारा पिकाच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना २५ हजार क्विंटल बियाणांचे वितरण करण्यात येणे व त्यातून ५८ हजार हेक्टर क्षेत्रावर चारा पिकाची लागवड करण्यात आल्याने एकूण ३० लाख मेट्रिक टन चाऱ्याचे उत्पादन झाले असणे, दिनांक १५ मे, २०१९ पासून चारा छावणीतील जनावरांच्या अनुदान दरामध्ये वाढ करुन मोठया जनावरांसाठी प्रतीदिन रुपये १००/- व लहान जनावरांसाठी प्रतीदिन रुपये ५०/- हा वाढीव दर लागू केला असणे, चारा छावणीत दाखल झालेल्या जनावरांच्या उपस्थितीसाठी आठवड्यातून स्कॅनिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, टँकर मंजुरीचे अधिकार उपजिल्हाधिकारी यांना व चारा छावणी मंजुर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून मागणी होताच ताबडतोब टँकर व चारा छावणी मंजुर करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, सद्यःस्थितीत २८,५२४ गावांमध्ये दुष्काळ/दुष्काळ सदृश परिस्थिती घोषित करण्यात आली असणे व त्याअनुषंगाने १७,९८५ गावांना दुष्काळी अनुदान वाटप करण्यात आले असणे व उर्वरित १०,५३९ गावांना वर उल्लेखित इतर ८ सुविधा लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, दुष्काळबाधित शेतकऱ्यांना कृषी विषयक मदत वाटप करण्यासाठी केंद्र शासनाकडून रुपये ४,७१४ कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात

आली असणे, राज्यातील एकूण ६८,३०,८६५ शेतकऱ्यांना रुपये ४,५०८ कोटी रकमेच्या मदतीचे वाटप करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील शेतकऱ्यांची विद्युत देयके थकित असल्याने बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांची विद्युत जोडणी पुर्ववत करण्याकरिता शासनाकडून विद्युत देयके अदा करण्यात येणे व त्यापोटी मार्च, २०१९ अखेरपर्यंत रुपये १३२.३० कोटी इतका निधी खर्च झाला असणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात दिनांक ११ मे, २०१९ रोजी संपलेल्या आठवडयामध्ये एकूण ३६,६६० कामे चालू असून त्यावर ३,४०,९५२ इतकी मजूरांची उपस्थिती असल्याचे निदर्शनास येणे, चारा छावण्यांमधील पशुधनाची नोंदणी करुन पशुधनाच्या संख्येची दैनंदिन नोंद ठेवण्यासाठी ॲन्ड्राईड मोबाईलवर आधारित प्रणालीचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे व शौर्य टॅक्नोसॉफ्ट प्रा.लि. या संस्थेने तयार केलेली प्रणाली विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात येणे, या संस्थेमार्फत सदर प्रणालीचा वापर करण्याबाबतचे एक दिवसीय प्रशिक्षण चारा छावणी चालकांचे पर्यवेक्षक/कर्मचारी तसेच महसूल विभागातील कर्मचारी यांना जिल्हास्तरावर उपलब्ध करुन देण्यात येणे, चारा छावण्यांमध्ये दाखल होणाऱ्या पशुधनांची रोगप्रतिकारक शक्ती व उत्पादन क्षमता कायम राहण्याकरिता त्यांना देण्यात येणारा हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस इ. खाद्याच्या प्रमाणात वाढ करुन मोठया जनावरांकरिता १८ कि.ग्रॅ. व लहान जनावरांकरिता ९ कि.ग्रॅ. याप्रमाणे खाद्याचे प्रमाण सुधारित करण्यात आले असणे, राज्यात प्रथमच शेळया-मेंढ्यांसाठी छावणी सुरु करण्याचा तसेच राज्यातील दुष्काळी भागात सुरु असलेल्या चारा छावण्यांमधील जनावरांसाठी टँकरने पाणी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळ उपसमितीने दिनांक ३० मे, २०१९ वा त्यासुमारास घेतला असणे, सद्यःस्थितीत राज्यात ६,२०९ टँकरच्या माध्यमातून ४,९२० गावे आणि १०,५०६ पाड्यांवर पाणी पुरवठा केला जात असणे, राज्यात पिक विम्याच्या भरपाईपोटी आतापर्यंत ३४ लाख शेतकऱ्यांना २२ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास येणे, मागील ४ वर्षात ४ कोटी ७२ लाख शेतकऱ्यांना १४,७७३ कोटी रुपये इतकी भरीव नुकसान भरपाई दिली असल्याचे निदर्शनास येणे, कापुस व धान पिकावरील किडीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेशिवाय ३,३३६ कोटी रुपयांची भरपाई शासनाकडून दिली असल्याची बाब निदर्शनास येणे, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये आढावा बैठकांचे आयोजन करुन दुष्काळ नियंत्रणाचे कार्य युध्द पातळीवर सुरु असणे, जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावर क्षेत्रीय कर्मचारी प्रशिक्षणाचे व पेरणीपूर्व मशागती व तयारीबाबत विविध पिकांच्या शेतीशाळांचे आयोजन करण्यात येणे, दिनांक २४ मे ते ८ जून, २०१९ या कालावधीत उन्नत शेती, समृध्द शेतकरी अभियान राबविण्यात येणे, कृत्रिम पाऊस निर्माण करण्याच्या दृष्टीने होत असलेला प्रयत्न, तूर्तास पेरणी न करण्याबाबत आतापर्यंत जवळपास एक लाखाच्या वर शेतकऱ्यांना एसएमएसव्दारे सूचना करुन बियाणे वाया जाऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येऊन खरीपाचे नियोजन करण्याचा प्रयत्न इ. दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून गांभीर्याने करण्यात आलेल्या उपरोक्त उपाययोजना व कार्यवाही विचारात घेऊन त्याअनुषंगाने करावयाची कार्यवाही."

विधान भवन,
मुंबई
दिनांक : १८ जून, २०१९

जितेंद्र भोळे
सचिव (का.),
महाराष्ट्र विधानसभा